**मुख्य वनसंरक्षक (प्रा) यवतमाळ, वनवृत्त यवतमाळ यांचे कार्यालय**
डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, पळसवाडी कॅम्प, दारव्हारोड, यवतमाळ-४४५००१
फोन नं.०७२३२-२४२८९४/२४२११४ फॅक्स-०७२३२-२४२११४ ई-मेल-conytlyvt@gmail.com/ ccftyavatmal@mahaforest.gov.in

**तातडीचे/ ई-मेल व्दारे.**

विषय:- फाळेगाव संग्राहक योजना ता.जि.वाशिम
वन(संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत ७.६५ हे.
वनजमीन मागणी प्रस्ताव

क्रमांक-मुवसं(य)/कक्ष-१०/वसं/ 6430 /२०१४-१५
यवतमाळ ४४५००१ दिनांक २७ / ०३ / २०१५.

संदर्भ-आपलेकडील पत्र क्र. २३०८ दि. २१.०२.२०१५.

---ooo---

विषयांकित प्रकरणाबाबत प्रस्ताव आपलेकडील संदर्भिय पत्रांन्वये या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावाबाबत भाग-२ आपले कार्यालयाकडुन online केलेबाबत दि.२०.०३.२०१५ रोजी निदर्शणास आलेले आहे.

प्रस्तावातील भाग-२ बाबत online माहीती तपासली असता त्यात प्रामुख्याने खालील त्रुटया निदर्शणास आलेल्या आहेत.

१. भाग-२ मधील अ.क्र.२ मध्ये वनजमीनीचे वैधानिक स्वरुप Revenue Forest असे दिलेले आहे.
२. अ.क्र.४ (ii) मध्ये त्रोटक माहिती भरलेली आहे.
३. अ.क्र.५ मध्ये वळते करावयाचे वनक्षेत्राबाबत कार्य आयोजना तपशिल दिलेला नाही.
४. अ.क्र.७ मध्ये वळते करावयाचे क्षेत्रापासुन वनक्षेत्राचे अंदाजित अंतराबाबत माहिती भरलेली नाही.
५. अ.क्र.१२ मध्ये वनभंगाबाबत माहीती भरलेली नाही.
६. अ.क्र.१३ (ii) मध्ये पर्यायी वनीकरण योजना रु.४५,१६०००/- दर्शविलेली आहे. मा.प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), म. रा. नागपुर यांचेकडील पत्र क्र.१३१२ दि.१३.११.२०१३ अन्वये प्राप्त नमुना दरपत्रकानुसार नमुना क्र.२ साठी ७ वर्षासाठी रु.२,१८,६१९/-प्रति हेक्टरी खर्च हत्यार भाडे व मजुर कल्याण निधीसह दिलेला आहे, तथापी प्रस्तावामध्ये रु.५,९०,०००/- प्रति हेक्टरी खर्च दिलेला आहे, याबाबत तपासणी/खातरजमा करुन सुधारीत आकडेवारी प्रस्तावात समाविष्ट करावी.
७. अ.क्र.१४ मध्ये District Profile बाबत अद्यावत माहिती भरावी.

प्रस्तुत प्रस्तावाबाबत कार्यवाहीसाठी यापुर्वीच प्रचंड विलंब झालेला आहे. त्यामुळे वरीलप्रमाणे परिपुर्ण माहीती आजच online व्दारे भरावी व त्याप्रमाणे प्रस्तावात दुरुस्ती करणेसाठी⊗संबंधित सर्व्हेक्षक यांना दि.३०.०३.२०१५ रोजी न चुकता या कार्यालयात हजर राहणेसाठी निर्देश द्यावेत.

⊗ व कलम-४ अंतर्गत प्रस्तावातील त्रुटीपूर्ततेसाठी

(sd/- 27/3)
**मुख्यवनसंरक्षक(प्रा)**
**यवतमाळ**

प्रति,
उपवनसंरक्षक,
अकोला.

(sd/- 27/3/15)

प्रतिलीपी-अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपुर यांना माहीतीस सादर.
प्रतिलीपी-कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग वाशिम यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

Gen Lr New4